# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES**

म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४

Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.

**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176

**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्र. मआविवि/पीआर/७७५/२०११ वृत्त प्रसिध्दीसाठी दि.२४ ऑगस्ट २०११

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठास भेट.

**नाशिक (दि.२४)** - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठास महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या पदाधिकाऱ्यांनी आज भेट दिली. याप्रसंगी आयोगाचे पदाधिकाऱ्यांमध्ये अध्यक्ष श्री. बलदेव चंद, विधी सदस्य श्री.सी.एल. थुल, सामाजिक व आर्थिक सदस्य श्री. आर.पी.वळवी आणि आयोगाचे अधिकाऱ्यांमध्ये सदस्य सचिव श्री. रमेश शिंदे, पोलीस अधीक्षक श्री. आर.एल. पवार आणि वरिष्ठ संशोधन अधिकारी श्री डी.डी. देशमुख, विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.अरुण जामकर, कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांनी सांगितले की, शासनाच्या विविध शासन निर्णयानुसार विहित पध्दतीने आरक्षणानुसार पदे विद्यापीठात भरली जातात. त्यासाठी विद्यापीठातर्फे जाहिरात देण्यात येऊन विहित पध्दतीचा अवलंब करण्यात येतो असे सांगितले. सध्या विद्यापीठामध्ये अ व ब वर्गातील असलेल्या पदांच्या अनुषेशाकरीता जाहिरात देण्यात आली असून ते काम अंतिम टप्प्यात असून रिक्त असलेल्या अनुषेश पदांची भरती केली जाणार आहे. त्याच प्रमाणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये सदर महाविद्यालयांकडून दरवर्षी अनुषेश भरती करीता जाहिरात प्रसिध्द करण्यात येते. त्याची प्रत विद्यापीठाकडे महाविद्यालय पाठवित असते. ते पुढे म्हणाले की, बहुतेक विद्यार्थी पदवी मिळाल्यानंतर स्वतःचा व्यवसाय सुरु करीत असतात यामुळे महाविद्यालयात शिक्षकांच्या जागा रिक्त असतात असे त्यांनी सांगितले.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर यांनी सांगितले की, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया ही शासकीय महाविद्यालयांसाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग आणि खाजगी संस्थाकरीता ए.सी.यु.पी.एम.डी.सी. यांच्यामार्फत केली जाते. प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांच्या सर्व दस्ताऐवजांची माहिती महाविद्यालयांकडून घेतली जाते. प्रवेश हा महाविद्यालयामार्फम होत असल्याने विद्यार्थ्यांच्या पात्रतेसंबंधीची पूर्तता करणे महाविद्यालयांची जबाबदारी असते. याकरीता विद्यापीठाच्या पात्रता विभागामार्फत संबंधीत महाविद्यालयांकडून माहिती मागविण्यात येते, विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्राअभावी त्यांचा प्रथम वर्षाचा निकाल पूर्तता करे पर्यत राखून ठेवून त्याबाबतची जाणीव विद्यार्थ्यांना तसेच त्यांच्या महाविद्यालयांना करुन देण्यात येते असे त्यांनी सांगितले.

यावेळी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष श्री. बलदेव चंद यांनी सुरुवातीला आयोगाच्या कार्यप्रणाली बाबत माहिती दिली. सदर बैठकीचे आयोजन प्रामुख्याने सर्व शासकीय, निमशासकीय आणि विद्यापीठांमध्ये शासनाने ठरवून दिलेल्या आरक्षणाच्या नियमावलीप्रमाणे पदे भरली जातात किंवा नाही याबाबतची अद्ययावत माहिती प्राप्त करण्यासाठी करण्यात आले असल्याचे सांगितले. यावेळी आयोगाचे सदस्य श्री. सी.एल. थुल, श्री.आर.पी. वळवी, सदस्य सचिव श्री. रमेश शिंदे आदींनी चर्चेत सहभाग घेतला. याबैठकीचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर यांनी केले. याप्रसंगी शैक्षणिक विभागप्रमुख डॉ.सुनिल फुगारे, आस्थापना विभागप्रमुख डॉ.आर.टी.आहेर, उपकुलसचिव श्री. महेंद्र कोठावदे, वित्त व लेखाधिकारी श्री.एन.व्ही.कळसकर, पात्रता विभागप्रमुख श्री. नितिन कावेडे, विधी विभागप्रमुख श्री.संदीप कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी श्री. स्वप्नील तोरणे, ग्रंथपाल श्री. प्रशांत शिंदे, औरंगाबाद विभागीय केंद्राचे श्री.बाब्रस आदी अधिकारी उपस्थित होते.

S.D.

कुलसचिव

**मा. संपादक,** सदर वृत्त आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्यांमधून प्रसिध्द करावे ही विनंती.

(स्वप्नील तोरणे)

जनसंपर्क अधिकारी

